



# पारनेर दर्शन






वर्ष ३ अंक ९०, शुक्रवार २८ फेब्रुवारी २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## हातपाय बांधून मारहाण, शेतीवरून दंगा आणि चोरी

### विरोली, दैठणेगुंजाळ, शहाजापुर येथील घटना





पारनेर : प्रतिनिधी

**बैलगाडा घाटाचे काम आवडले नाही म्हणून जेसीबी मालकाकडून चालकाचे हातपाय बांधून विरोलीत मारहाण करण्यात आली. दैठणे गुंजाळ येथे शेतीच्या वादातून महिलेस धक्काबुक्की करत दंगा झाला तर शहाजापुर येथे चोरट्याने घरातून घुसून महिलेच्या कानातील वेल आणि ५५ हजार रूपयांची रोकड चोरून नेली.**

तिनही गुन्हयांबाबत पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार विरोली येथे जेसीबी चालक किरण चंद्रकांत साळवे रा. पळशी, ता. पारनेर हे विरोली येथे जे.सी.बी.मशीनच्या माध्यमातून बैलगाडा घाटाचे काम करत होते. जाधव हे करत असलेले काम ग्रामस्थांना आवडले नाही. म्हणून किरण साळवे यांनी जेसीबी मालक आरोपी प्रदीप शशिकांत जाधव रा. विरोली ता. पारनेर यास घाटाचे काम तुम्ही करा, मला माझा पगार द्या, मला तुमच्याकडे काम करायचे नाही असे सांगितल्याचा राग येऊन प्रदीप जाधव याने लाथा बुक्क्यांनी किरण साळवे यांच्या तोंडावर, पाठीवर, छातीवर मारहाण केली तर दुसरा आरोपी सचिन शिवराज डोळस रा. विरोली, ता. पारनेर याने हातातील लाकडी काठीने तसेच रस्सीने पाठीत मारहाण केली. प्रदीप किरण साळवे यांचे रस्सीने हातपाय बांधून पुन्हा लाथाबुक्क्यांनी मारहाण करीत दोघे आरोपी घटनास्थळावरून निघून गेल्याचे फिर्यादीत नमुद करण्यात आले आहे.

किसन चंद्रकांत साळवे यांच्या फिर्यादीवरून प्रदीप शशिकांत जाधव व सचिन शिवराम डोळस यांच्याविरोधात पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहाजापुर शिवारात सुझलॉन कंपनीकडे जाणाऱ्या रस्त्यालगत राहणाऱ्या खंडू बन्सी मोटे या शेतकरी कुटूंबाच्या घरात पहाटे साडेतीन वाजता घुसून अज्ञात चोरटयाने खंडू मोटे यांच्या पत्नीच्या कानातील वेल तसेच त्यांच्या उशाला ठेवलेले रोख २५ हजार रूपये चोरून नेले. याप्रकरणी सुपा पोलीस ठाण्यात खंडू मोटे यांनी फिर्याद दाखल केली असून सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली पो हे कॉ गोरे हे पुढील तपास करत आहेत.

पारनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दैठणे गुंजाळ येथे शेतीच्या वादातून दंगा झाला. शोभा रामदास झडे या त्यांच्या घरासमोर उभ्या असताना मल्हारी गोरख खेडे रा. दैठणे गुंजाळ व इतर झडे यांच्या शेतामध्ये जात होते. त्यावर शोभा झडे यांनी आम्ही आमच्या शेतामध्ये का जाता ? ही शेती आमची आहे असे बजावले. त्याचा राग येऊन मल्हार गोरख खेडे व एकनाथ येणाजी खेडे दोघेही रा. दैठणे गुंजाळ यांनी शोभा झडे यांना शिवीगाळ करून धक्काबुक्की केली. त्यापाठोपाठ दत्ता एकनाथ खडे, रोहिणी दत्ता खडे, मच्छिंद्र येणाजी खडे, जयराम मच्छिंद्र खडे, गुडडी जयराम खडे, राणी मल्हारी खडे, गणेश एकनाथ खडे, भिकुबाई एकनाथ खडे, राधाबाई तुकाराम खडे सर्व रा. दैठणे गुंजाळ ता. पारनेर यांनी शोभा झडे यांना वाईट शिविगाळ करून ही शेतजमीन आमची आहे. तुम्ही इथे कसे राहता, तुम्ही बोअरचे पाणी भरायचे नाही अशी दमदाटी केली. शोभा रामदास झडे यांच्या फिर्यादीवरून सर्व ११ आरोपींविरोधात पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पारनेर पोलीस करत आहेत.

## गृह खात्याचा अंकुश राहिला नाही

### स्वारगेटच्या घटनेवर नीलेश लंके यांची प्रतिक्रिया

अहिल्यानगर : प्रतिनिधी

**स्वारगेट बस स्थानकामध्ये २६ वर्षीय तरूणीवर झालेला अत्याचार तसेच राज्यात प्रत्येक दिवशी घडत असलेल्या गंभीर घटना पाहता गृहखात्याचा पोलीस प्रशासनावर अंकुश राहिला नसल्याची टीका खासदार नीलेश लंके यांनी केली.**

स्वारगेट बसस्थानकात तरूणीवर अत्याचार झाल्याच्या घटनेविषयी पत्रकारांशी छेडले असता खा. लंके म्हणाले, महिलांच्या सुरक्षेवर



आज प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्वारगेटची घटना घडल्यानंतर आजूनही आरोपी सापडला नाही हे दुर्दैव आहे. पंधरा दिवसांपूर्वी माजी आरोग्यमंत्री यांचा मुलगा गेल्यानंतर त्याला काही तासात माघारी आणले जाते. दुसरीकडे इतकी भयानक घटना घडूनही अद्याप काहीही तपास लागू शकत नाही हे राज्यातील सरकारचे अपयश आहे. प्रत्येक दिवशी वेगवेगळया घटना घडत आहेत. हे राज्यातील गृह खात्याचे अपयश आहे. गृहखात्याचा पोलीस प्रशासनावर अंकुश राहिलेला नाही हेच त्यातून स्पष्ट होत असल्याचे खा. लंके यांनी सांगितले.

## स्वारगेट प्रकरणातील आरोपीची खैर नाही

### ■ नराधमाला फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशी सरकारची भूमिका ■ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई : प्रतिनिधी

**पुण्यातील स्वारगेट बसस्थानकावर घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे. लाडक्या बहिणीवर अत्याचार करण्याची गय केली जाणार नाही. आरोपी हा कुठल्याही पक्षाचा असला तरी त्याच्यावर कारवाई केली जाईल. नराधमाला फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशी सरकारची भूमिका आहे. त्यासाठी पूर्णपणे प्रयत्न करण्याचे सरकारचे धोरण असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.**

पुण्याच्या स्वारगेट बसस्थानक परिसरात उभ्या असलेल्या शिवशाही



बसमध्ये मंगळवारी पहाटे ५.३० च्या सुमारास एका २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार झाला होता. या घटनेमुळे एकच खळबळ माजली होती. अत्याचार करून फरार झालेला आरोपी स्थानकातील सीसीटीव्हीत कैद झाला. दत्तात्रय रामदास गाडे असे त्याचे नाव असून त्याच्या शोधासाठी पोलिसांची १३ पथके रवाना झाली असून तपास केला जात आहे.

घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे. या घटनेचा निषेध करावा तेवढा कमीच आहे. आमच्या लाडक्यासोबत निंदनीय प्रकार घडलेला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मी स्वत: या प्रकरणात लक्ष घालून आहे. मी स्वत: पुणे पोलिसा आयुक्तांशी चर्चा केली आहे. याप्रकरणी कठोर कारवाई करण्याच्या सूचना आम्ही सरकारच्या वतीने दिलेल्या आहेत. आरोपीचे उर्वरीत पान ३ वर







# प्रगतीमंत्र

## महिलांना घरबसल्या करता येणारे व्यवसाय

**लग्नानंतर कुटुंबियांची इच्छा नसल्याने अथवा बाळंतपणानंतर मुलांच्या जबाबदारीमुळे महिलांना नोकरी करणे शक्य होत नाही. मात्र सध्याच्या काळात मर्यादित उत्पन्नावर घर चालविणे मुश्कील होत आहे. त्यावेळी कमावत्या व्यक्तीला हातभार लावण्यासाठी घरच्या सर्व जबाबदाऱ्या सांभाळून चांगली कमाई करण्याचे अनेक मार्ग महिलांसाठी आता उपलब्ध आहेत...**



- मेस अथवा टिफीन : बहुतेक स्त्रिया स्वयंपाक करण्यात निपुण असतात. अशा महिला टिफीनचा अथवा जागा असल्यास मेस चालविण्याचा व्यवसाय सुरू करू शकतात. जे लोक कामानिमित्त अथवा शिक्षणासाठी घरापासून दूर राहतात अशा नोकरदारांना आणि विद्यार्थ्यांना टिफीन अथवा मेस सेवा देऊ शकतात.
- फ्रीलान्स रायटींग : ज्या महिलांना लिखाणाची आवड असेल; शैली असेल; चांगले लिहू शकत असतील तर त्या फ्रीलान्स लेखन करू शकतात. एखाद्या वर्तमानपत्राने किंवा मॅगझिनने लिखाण प्रसिद्ध करून एका लेखाला कमीत कमी २०० रुपये दिले आणि दिवसभरात ३ लेख जरी लिहीता आले तरी दरमहा १५ ते १८ हजार रुपयांचे उत्पन्न मिळू शकेल.
- मेकअप, ब्युटीशियन : मेकअप आणि ब्युटी पार्लरची आवड बहुतेक महिलांना असते आणि त्यांना त्यासंदर्भात ज्ञानही सहज मिळते. अल्पावधीचे प्रशिक्षण, थोडेसे भांडवल आणि कल्पकता या भांडवलावर हा व्यवसाय करता येतो.
- शिकवणी : सर्वसाधारणपणे पदवी किंवा समकक्ष शिक्षण घेतलेल्या, समजावून देण्याची क्षमता आणि न रागावता मुलांना समजेपर्यंत समजावून देण्याचा पेशन्स असलेल्या महिला घरातच अथवा छोट्याश्या जागेत शिकवणी अर्थात ट्युशन घेऊ शकतात. आपले ज्ञान इतरांना दिल्याने ते कमी न होता वाढते. अद्ययावत राहते. याशिवाय त्यापासून चांगले उत्पन्नही मिळू शकते. अर्थात हा पर्याय केवळ महिलांनाच नव्हे; तर पुरुषांनाही उपयुक्त आहे.
- छंद वर्ग : अनेक महिलांना विद्यार्थी दशेपासून शिवण, वीणकाम, रुटीनपेक्षा वेगळ्या प्रकारचे नावीन्यपूर्ण पदार्थ बनविणे, चित्रकला, संगीत, नृत्य अशा अनेक प्रकारचे छंद जोपासणे आवडते. त्याचे प्रशिक्षण घेतल्यानंतर ही कला इतरांना शिकविणे हा मोठा व्यवसाय होऊ शकतो. अशा व्यवसायाने आपला छंद जोपासण्याची संधी, जोडीला आकर्षक कमाई आणि इतरांना या कलेचे प्रशिक्षण देऊन कलेची सेवा केल्याचे समाधान असा तिहेरी फायदा मिळू शकतो.



## सुरू करा प्लेसमेंट सर्व्हिस!

**सध्या आपल्या देशात नोकरी आणि शिक्षण यांच्या संबंधात जो असमतोल निर्माण झाला आहे त्यातून प्लेसमेंट सर्व्हिस ही एक सेवा विकसित झाली आहे. या सेवेमध्ये नोकरी मिळवणारा आणि नोकरी देणारा या दोन्हींच्या मध्ये चांगलाच समन्वय साधला जातो. आपल्या देशात बेकारी आहे, असे बऱ्याचदा म्हटले जाते. परंतु काही क्षेत्रात अशी परिस्थिती आहे की बेकारी नावाचा प्रकार या देशात असेल असे वाटतसुध्दा नाही. मग हा असमतोल काय आहे? देशात बेकारी नाही का? या प्रश्नाचे उत्तर देशात बेकारी आहे असे होऊ शकते. पण ती कोठे आहे? जिथे कसलेही कौशल्य हाती नसणारे लोक आहेत तिथे बेकारी आहे. आपल्या देशात शिक्षण व्यवस्थेला काही शिस्त नाही. शिक्षण घेऊ इच्छिणारे लोक नोकरी मिळते म्हणून शिकत राहतात आणि आपण एक विशिष्ट शिक्षण घेतले की आपल्याला त्या शिक्षणाशी संबंध असलेली किंवा नसलेली नोकरी मिळालीच पाहिजे अशी त्यांची अपेक्षा असते. डी.एड. किंवा बी.एड. अशा व्यावसायिक शिक्षणाच्या बाबतीत तर असे नेहमीच घडते. या दोन पदव्या मिळवणारा विद्यार्थी आपल्याला शिक्षक म्हणून नोकरी मिळणारच अशी अपेक्षा बाळगून बसतो आणि ती मिळाली नाही की निराश होतो आणि बहुतेक त्याला ती मिळत नाही. कारण त्याच्यासारखीच अपेक्षा धरून लाखो मुलांनी डी.एड., बी.एड. या पदव्या मिळवलेल्या असतात.**



शिकणारी मुले लाखो असली तरी नोकऱ्या काही त्या संख्येत निर्माण होत नाहीत. काही मुले केवळ बीए. बी.कॉम, बी.एस्सी अशा औपचारीक पदव्या मिळवत राहतात. त्याही शिक्षणातून कोणत्याही नोकरी विषयक कौशल्याचे शिक्षण किंवा प्रशिक्षण मिळालेले नसते. असे लाखो बेकार पडून आहेत. मात्र दुसऱ्या बाजूला अशी परिस्थिती आहे की विशिष्ट कौशल्य असणारे लोक संख्येने फार कमी आहेत आणि त्यांना मागणी प्रचंड असल्यामुळे त्यांची किंमत वाढलेली आहे. विशेषतः संगणक शास्त्राचे शिक्षण घेतलेले विद्यार्थी किंवा प्रशासनाचा उत्तम अनुभव असलेले प्रशिक्षित प्रशासक, वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम करू शकणारे पदवीधर हे मिळत नाहीत. चांगले डीटीपी ऑपरेटर मिळत नाहीत. अनेक दैनिकांना संपादकीय कौशल्य जाणणारे पदवीधर प्रशिक्षित तरुण मिळत नाहीत. अशी न मिळणाऱ्या प्रशिक्षित कुशल तंत्रज्ञांची मोठी गरज असते. वेगळ्या शब्दात सांगायचे झाले तर काही क्षेत्रात नोकऱ्या कमी आणि त्या मागणाऱ्यांची संख्या मोठी आहे. उलट काही क्षेत्रात नोकऱ्या खूप आहेत पण त्या मागणाऱ्यांची संख्या कमी आहे. ही विसंगती कमी करून योग्य त्या संस्थांना योग्य ते कर्मचारी, तंत्रज्ञ मिळवून देणे असा एक व्यवसाय विकसित झाला आहे. तो म्हणजे प्लेसमेंट सर्व्हिस. या व्यवसायाचे स्वरूप थोड्याबहुत फरकाने शासनाच्या रोजगार विनिमय केंद्रासारखेच आहे. परंतु शासनाचे हे केंद्र केवळ सरकारी आणि निमसरकारी नोकऱ्या मिळवून देते. त्यातसुध्दा नाव नोंदणाऱ्या व्यक्तीला नोकरी मिळवून देण्याची हमी हे केंद्र घेत नाही. एका बाजूला इच्छुकांनी आपली नावे नोंदलेली असतात आणि दुसऱ्या बाजूला काहीच नसते. जेव्हा त्या त्या खात्यातून माणसांची गरज कळवली जाते तेव्हा या केंद्रातील उमेदवारांची नावे नोंदलेल्या क्रमानुसार त्या संस्थांना कळवली जातात. केंद्राने नावे सुचवले म्हणजे नोकरी दिलीच पाहिजे, असे बंधन या केंद्रावर नाही आणि योग्य त्या उमेदवाराला त्याच्या लायकीची नोकरी कोठे आहे हे दाखवण्याची जबाबदारीसुध्दा केंद्रावर नाही. या केंद्राचा खाक्या निव्वळ सरकारी स्वरूपाचा आहे. त्यामुळे नोकऱ्या मागणारे आणि नोकऱ्या देणारे यांचा योग्य मेळ या सरकारी रोजगार विनिमय केंद्रातून घातला जातोच असे नाही. त्याची ही उणीव भरून काढण्याचे काम प्लेसमेंट सर्व्हिस करते. प्लेसमेंट सर्व्हिसकडे संस्था आणि कंपन्यांची रिक्वायरमेंट म्हणजे गरज नोंदली जाते आणि नोकरी मिळवण्यास इच्छुक असलेले विद्यार्थी या सर्व्हिसकडे नावे नोंदवतात. नावे नोंदवण्यास पैसे घ्यावेत की नाही हा ज्या त्या संस्थेचा कार्यपध्दतीचा भाग आहे. परंतु साधारणपणे नाव नोंदणीला पैसे घेतले जात नाहीत. आपल्याकडे नाव नोंदलेला विद्यार्थी कोणत्या कंपनीची गरज पूर्ण करू शकतो याचा प्लेसमेंट सर्व्हिसकडून तळमळीने आढावा घेतला जातो आणि त्याला ती नोकरी मिळवून देण्याचा प्रयत्न केला जातो. त्या विद्यार्थ्याकडे ते कौशल्य असते आणि कंपनीला त्या व्यक्तीची गरज असते. अशा परिस्थितीत नोकरी मिळवून दिल्याबद्दल त्या उमेदवाराच्या पहिल्या वेतनाचा काही भाग प्लेसमेंट सर्व्हिसला मोबदला म्हणून मिळतो, तर कंपनीची गरज भागल्यामुळे कंपनीसुध्दा त्या व्यक्तीच्या एक महिन्याच्या पगाराची रक्कम प्लेसमेंट सर्व्हिसला बक्षीस म्हणून देते. हा व्यवसाय कसलीही गुंतवणूक न करता येतो. कंपन्यांची गरज नोंदवून घेणे यासाठीच्या आणि विद्यार्थ्यांच्या नावे नोंदणीसाठीच्या सोयी निर्माण करण्यासाठी लागेल तेवढेच म्हणजे अगदी नाममात्र भांडवल लागते. पण उत्पन्न मात्र चांगले मिळते.

## व्हा लेबर कॉन्ट्रॅक्टर!

**सध्याच्या काळात शारीरिक श्रम करणारे मजूर मिळणे फार अवघड झाले आहे. त्यामुळे एखादे मोठे काम तडीस नेण्यासाठी ते विशिष्ट काम करण्याचे कौशल्य ज्ञात असणारे विशिष्ट मजूरच कामावर ठेवावे लागतात. काही मजुरांमध्ये उत्तम स्लॅब टाकण्याचे कसब असते, तर काही मजूर खोदकाम करण्यात वाकबगार असतात. काहींना भूमिगत केबल टाकण्याची कला ज्ञात असते तर काही मजूर घरे बदलणाऱ्या लोकांचे सामान वाहून नेण्यात तज्ज्ञ असतात. परंतु अशा प्रकारचे स्पेशल काम करणारेच काय पण ओबडधोबड काम करणारे अकुशल मजूर सुद्धा मिळणे दुरापास्त होऊन बसले आहे. मग काही वेळा रस्ता रुंदीकरणाच्या कामासाठी आंध्रातले मजूर आणावे लागतात, तर केबल टाकण्यासाठी ओरिसातल्या मजुरांची गरज भासते. सेंट्रिंगची उत्तम कामे करणारे मजूर बंगालमधून आणावे लागतात, तर बांधकामावर बिहारमधले मजूर उत्तम काम करतात. सध्या साऱ्या देशातच बिहार, बंगाल, ओरिसा, आंध्र या चार राज्यातले अंगमेहनत करणारे मजूर सगळीकडे कामे करताना दिसत आहेत. मात्र कामाची गरज ओळखून त्यांच्याशी संपर्क साधणे, त्यांना घेऊन येणे, नेऊन सोडणे, कामाच्या काळात त्यांची व्यवस्था करणे अशी अनेक कामे करणाऱ्या एजंटांची गरज असते.**

### उत्पन्न भरपूर...

लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून काम करणाऱ्या अनेक लोकांनी भरपूर उत्पन्न मिळवलेले आहे. हैदराबादेतील एक कोट्यधीश उद्योगपती मन्नम मधुसुदन राव यांच्या आयुष्यावरचे एक पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. त्या पुस्तकात या दलित समाजातल्या कोट्यधीश उद्योगपतीची माहिती दिलेली आहे. अतिशय विपण्णावस्थेत जगणारे एम.एम. राव हे खड्डे खोदून त्यात टेलिफोनच्या केबल्स टाकण्याचे काम करत होते. मात्र एकेदिवशी हे काम करत असतानाच आपल्या दोन अधिकाऱ्यांचे बोलणे त्यांनी ऐकले. हे केबल अंथरण्याचे काम एखाद्या लेबर कॉन्ट्रॅक्टरवर सोपवून दिले तर बरे होईल, कामाची देखरेख करण्याचे आपले कष्ट वाचतील, असे ते बोलत होते. ते ऐकून एम.एम. राव यांनी त्या अधिकाऱ्यांची भेट घेतली आणि आपल्याला लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून काम करण्याची संधी द्यावी अशी विनंती केली. त्यांच्यासोबत काम करणारे काही मजूर आणि ओळखीचे काही मजूर यांना एकत्र करून त्यांचे कॉन्ट्रॅक्टर म्हणून एम. एम. राव यांनी ते केबल अंथरण्याचे काम स्वीकारले आणि त्यावर देखरेख करण्याची जबाबदारी सुद्धा घेतली. त्यातून त्यांना चांगली प्राप्ती झाली. अन्य राज्यातली कामेही मिळाली. त्यावर त्यांनी तीन वर्षांत अडीच कोटी रुपयांचा बंगला खरेदी केला. तो बंगला त्याच भागात होता, तिथे ते सुरुवातीला मजूर म्हणून काम करत होते.



ज्या कंपन्यांना अशी कामे करावी लागतात त्यांचा विशिष्ट प्रकारच्या मजुरांशी थेट संपर्क नसतो. त्यामुळे अशा मजुरांची सविस्तर माहिती असणाऱ्या आणि त्यांच्याशी संपर्क असणाऱ्या लेबर कॉन्ट्रॅक्टरकडून त्या मजुरांशी संपर्क साधावा लागतो. या गरजेतून आणि परिस्थितीतून लेबर कॉन्ट्रॅक्टर हा एक नवा व्यवसाय उदयास आला आहे. हा व्यवसाय करण्यास भांडवल लागत नाही. मात्र ठिकठिकाणचे मजूर, त्यांचे जत्थे आणि त्यांच्या कामाची स्पेशालिटी यांची भरपूर माहिती अशा कॉन्ट्रॅक्टरकडे असावी लागते. त्याचे हे संपर्क हेच त्याचे भांडवल असते. अशा प्रकारचा हा व्यवसाय फक्त परराज्यातल्या मजुरांच्या बाबतीतच करता येतो असेही काही नाही, तर स्थानिक पातळीवर सुद्धा अशा मजुरांना संघटित करणाऱ्यांना मोठी मागणी असते. तेव्हा मोठी कामे सुरू असतील त्या ठिकाणी संपर्क साधून त्यांची गरज जाणून घेणे आणि संपर्कातून मजुरांची माहिती करून घेऊन त्याला काम मिळवून देण्याची हमी देणे अशा स्वरूपाचे हे काम आहे. म्हणजे हा सगळा संपर्काचा धंदा आहे. यातून अशा लेबर कॉन्ट्रॅक्टरला दोन प्रकारे उत्पन्न मिळू शकते. एक म्हणजे एखाद्या कामाच्या ठेकेदाराला पाहिजे तेवढे मजूर मिळवून देणे आणि ते मिळवून दिल्याबद्दल काही विशिष्ट रक्कम घेऊन मोकळे होणे. दुसरी पद्धत असते ती अशा एजंटाला त्या कामात गुंतवून टाकणारी असते. म्हणजे तो केवळ मजूरच मिळवतो असे नाही, तर त्या मजुरांकडून कामे करून घेण्याची जबाबदारीही स्वीकारतो आणि त्यांच्याकडून कामे करवून घेतो. पहिल्या पद्धतीत एकदा एखाद्या कंत्राटदाराला मजूर मिळवून दिल्यानंतरची जबाबदारी एजंटावर नसते आणि नंतर ते मजूर काय काम करतात याच्याशी त्याचा काही संबंध नसतो. त्यामुळे त्या पहिल्या पद्धतीत एजंटाला कमाई कमी होते. दुसऱ्या पद्धतीत मात्र त्याची जबाबदारी वाढलेली असते आणि मुख्य कंत्राटदाराकडून त्याला काही विशिष्ट रक्कम दिली जाते. त्यातून तो मजुरांना पगार देतो. त्या विशिष्ट रकमेतून पगार वजा जाता उरलेली सारी रक्कम त्याला मिळते. म्हणजे या प्रकारात जबाबदारीही जास्त असते आणि उत्पन्नही जास्त असते. परंतु बहुतेक एजंट या दुसऱ्या प्रकाराच्या भानगडीत पडत नाहीत. कारण त्या पद्धतीत काम करवून घ्यायचे झाल्यास त्याला प्रत्येक क्षेत्राची तांत्रिक माहिती असणे जरुरीचे होईल आणि ते नसताना त्याने मजूरही स्वत:च आणले आणि कामही स्वत:च करवून घेतले तर त्याचा तोटा होण्याची शक्यता असते. तांत्रिक ज्ञानाच्या अभावामुळे असे होऊ शकते.



## करा मध्यस्थी!




**कोणत्याही व्यवहारात देणारा आणि घेणारा यांच्यामध्ये सरळ व्यवहार होत नाही. हा व्यवहार दोघांच्याही मनाप्रमाणे व्हावा यासाठी मध्यस्थी करणारा एक मध्यस्थ हवा असतो. कारण दोघांनाही आपल्या अपेक्षा प्रत्येक वेळी थेट बोलून व्यक्त करता येत नाहीत. काही वेळा भिडस्तपणा आडवा येतो तर काही वेळा काही गोष्टी स्पष्टपणे बोलाव्या लागतात, त्या बोलता येत नाहीत. ही सारी कामे मध्यस्थ मंडळी करत असतात आणि कोणत्याही क्षेत्रात मध्यस्थीचा व्यवसाय करण्यास भरपूर संधी असते.**

प्रत्येक व्यवसायाचे काही नियम ठरलेले असतात, काही पायंडे पडलेले असतात. घर विकत घेणे, लग्न करणे, जमिनी विकत घेणे, वाहन विकत घेणे किंवा विकणे तसेच गुरांची खरेदी- विक्री करणे असे व्यवहार सामान्य माणसाच्या आयुष्यात नेहमी होत नाहीत. कोणीही आपल्या आयुष्यात असा व्यवहार एकदाच करतो. त्यामुळे त्याला ते पायंडे नियम, माहीत नसतात. म्हणून अशा व्यवहारांमध्ये हे सारे नियम आणि पायंडे माहीत असणारा मध्यस्थ गरजेचा असतो. असा मध्यस्थ पैसे कमावतो, परंतु त्याच्यामुळे व्यवहारातल्या दोन्ही बाजूंच्या व्यक्तींना समाधान प्राप्त होत असते. विशेष म्हणजे मध्यस्थी करण्याचा असा व्यवसाय हा बिनभांडवली व्यवसाय असतो. त्या व्यवहाराची त्या व्यक्तीला असलेली माहिती हेच त्याचे भांडवल असते. जनावरांच्या बाजारांमध्ये असे मध्यस्थ किंवा दलाल मोठ्या प्रमाणावर दिसतात. कारण ज्याला जनावर विकायचे असते तो जनावराजवळ उभा असतो आणि येणारा- जाणाऱ्यांपैकी ज्याची नजर त्या जनावरावर पडते तोच त्या जनावराविषयी चौकशी करतो. काही ठिकाणचे जनावरांचे बाजार एवढे मोठे असतात की त्यात शेकडो जनावरे विक्रीस आलेली असतात. त्या एवढ्या मोठ्या बाजारात जनावरांच्या किंमती साधारण किती आहेत याचा अदमास त्या व्यक्तीला आपल्या जनावराजवळ उभा राहिल्याने येत नाही. हा अंदाज दलालाला असतो. कारण त्याचे जनावर विक्रीला आलेले नसते आणि तो बाजारभर फिरत असतो. कोणत्या प्रकारच्या जनावराचे गिऱ्हाईक कोठे आहे आणि जनावरांच्या अंदाजे किंमती काय आहेत याच्याशी तो अवगत असतो. जनावर विकणारा आणि विकत घेणारा या दोघांशीही तो या माहितीच्या आधारावर योग्य ती चर्चा करू शकतो आणि तो प्रामाणिकपणे हे करत असेल तर जनावर विकणाऱ्याला जनावराची योग्य किंमत आल्याचे समाधान मिळते आणि जनावर विकत घेणाऱ्याला माफक किंमतीत जनावर मिळाल्याचे समाधान मिळते. या व्यवहाराबद्दल उभय बाजूंनी त्याला काही पैसे द्यावे लागले तर दोघांनाही वाईट वाटण्याचे कारण नसते. अशाच प्रकारची दलाली जमिनी, घरे, वाहने यांच्याही खरेदी-विक्रीमध्ये केली जाते. मोठ्या शहरामध्ये लोकांना भाड्याने घरे मिळवून देणारे दलाल या कामातून ब्रोकरेज मिळवतात. ब्रोकरेज हे दलालीचे दुसरे नाव आहे. घरे भाड्याने घेणाऱ्याला घराची गरज असते आणि अशा दलालाकडे घरांची यादी असते. तो त्याच व्यवसायात असल्यामुळे अशा घरांची यादी जमा करणे हाच त्याचा व्यवसाय असतो. त्यामुळे त्याची डायरी भरलेली असते. घर भाड्याने घेणाऱ्या व्यक्तीला भाड्याने घर देणाऱ्यांची एवढी यादी जमा करणे मुश्किलच असते. म्हणून त्याला ब्रोकर गरजेचा वाटतो. असा ब्रोकर केवळ घरच मिळवून देतो असे नाही तर भाड्याने घर घेऊ इच्छिणाऱ्यांच्या सोयीचे आणि परवडेल असे



घर तो मिळवून देतो. कारण त्याच्याकडे असलेल्या यादीत सगळ्या प्रकारची घरे नोंदलेली असतात. या व्यवहारामध्ये घराच्या मालकाला सुद्धा योग्य तो भाडेकरू मिळाल्याचे समाधान मिळते आणि घर घेणाऱ्या व्यक्तीला आपल्याला हवे तसे घर मिळाल्याचे समाधान प्राप्त होते. दोघांच्या मध्ये काम करणारा ब्रोकर पैसे मिळवतो, परंतु हे पैसे व्यर्थ जात नाहीत. सतत फिरून मिळवलेली घरांची यादी हेच त्याचे भांडवल असते आणि प्रामाणिकपणा हा व्यवहाराचा आधार असतो. अशाच प्रकारचा एक व्यवसाय म्हणजे वधू-वर सूचक मंडळ. घर, जमिनी आणि जनावरांचे बाजार यांच्यामध्ये दलाली करणाऱ्या व्यक्तीला घराबाहेर पडावे लागते, पण वधू- वर सूचक मंडळाला घराच्या बाहेर पडण्याची सुद्धा गरज नाही. दारावर मंडळाच्या नावाची पाटी लावली की, वधू आणि वर असे उभय बाजूंचे लोक आपल्या घरी येऊन नावे नोंदवतात. नाव नोंदणीबद्दल पैसे घ्यावेत की नाही हा ज्याच्या त्याच्या मर्जीचा विषय आहे. परंतु लग्न जमवताना इच्छुक वधू किंवा इच्छुक वर यांची नावे देण्यासाठी पैसे घेतले जातात. याही व्यवसायाला भांडवल लागत नाही. अनेक महिला आणि सेवानिवृत्त झालेले लोक हा व्यवसाय अगदी आवडीने करतात. मात्र नावे नोंदवून घेताना वय, जात, गोत्र, पोटजात आणि वधू- वरांविषयीच्या अपेक्षा यांची माहिती नोंदवून घेणे गरजेचे असते. समोर आलेला इच्छुक वर किंवा वधू हिला कोणते स्थळ योग्य ठरेल याचा अंदाज घेण्याचे कौशल्य सुद्धा असे वधू- वर सूचक मंडळ चालविणाऱ्याकडे असले पाहिजे. हाही तसा बिनभांडवली धंदा आहे. परंतु हा व्यवसाय करणाऱ्याचा जनसंपर्क जितका चांगला असेल आणि त्याचा स्वभाव जेवढा बोलका असेल तेवढा हा व्यवसाय चांगला करता येतो.

## मुलाखतीला जाताना पेहराव कसा असावा?

नोकरीसाठी मुलाखतीचे बोलावणे येते तेव्हा मुलाखतीला जाताना आपण कपडे कोणते घालावेत, असा प्रश्न प्रत्येकाला पडलेला असतो. कारण माणसाची पारख आणि निवड होण्यात कपड्याचा मोठा हिस्सा असतो आणि मुलाखतीचे तंत्र शिकवणारे लोक कपड्यांबाबत बरेच काही सांगत असतात. मुलाखत देणारा उमेदवार मुलाखतीच्या चेंबरमध्ये प्रवेश करतो तेव्हा निवड समितीचे लक्ष अभावितपणेच त्याच्या कपड्याकडे जाते आणि त्याचा पहिला प्रभाव कपड्यावरून पडतो. फर्स्ट इंप्रेशन इज लास्ट इंप्रेशन या तत्वानुसार त्याचा पहिला प्रभाव कपड्यांवरून पडणार असेल तर त्याचा कायमचा प्रभावही त्यावरच अवलंबून राहील हे तर नक्कीच आहे. मात्र या प्रभावासाठी कोणी फार सजून धजून किंवा नटून थटून जात असेल तर ते मात्र विपरित ठरेल. आपण नेहमी घालतो तेच कपडे घातले पाहिजेत. पण प्रभाव पडावा म्हणून कोणी वेगळेच कपडे घालून जात असेल तर त्या कपड्यामुळे येणारे अवघडलेपण क्षणोक्षणी लक्षात येईल. आपण आयुष्यात कधीच कोट वापरत नसू, पण केवळ मुलाखतीसाठी मित्राचा मागून आणलेला कोट घातला असेल तर ते निवड समितीच्या लक्षातही येते आणि आपल्याही हालचाली विचित्र होतात. तेव्हा आपला नेहमीचाच ड्रेस, पण चांगला इस्त्री करून घालून जावे. इंटरव्ह्यूसाठी म्हणून दागिने घालू नयेत. तेही विचित्र दिसते. स्वच्छ आणि इस्त्री केलेले कपडे घातल्याने आपण शिस्तप्रिय आणि नेटके आहोत हे लक्षात येत असते. मात्र कपड्यांचा रंग निवडताना न्यूट्रल कलरचे कपडे टाळावेत.

## शॉर्ट न्यूज

### शिवपुतळ्यासाठी झटावे लागणे दुर्दैवी

**नगर :** महाराष्ट्र राज्य छत्रपती शिवाजी महाराजांचे आहे अन् त्यांच्याच राज्यात त्यांच्याच पुतळ्यासाठी शिवप्रेमींना झटावे लागते, यासारखे दुर्दैव नाही. आज अर्धाकृती पुतळा बसला, लवकरच या ठिकाणी महाराजांचा अश्वारूढ पुतळा बसवण्यासाठी सर्वांनी एकजूट झाले पाहिजे. छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा अहिल्यानगरमध्ये बसवण्याचे काम चालू आहे. परवानगी असो वा नसो, छत्रपती संभाजी राजांचा पुतळा त्या ठिकाणी बसवणारच, त्यासाठी गटतट सोडून भगव्याखाली प्रत्येकाने एकत्र येण्याचे आवाहन आमदार संग्राम जगताप यांनी

### अफवांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान

**श्रीरामपूर :** सोशल मीडियावर द्राक्षे, डाळिंब किंवा टरबुजांमध्ये घातक औषध फवारणीची खोटी आणि बनावट माहिती प्रसारित केल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. गतवर्षी द्राक्षावरील औषध फवारणीच्या सोशल मीडियावरील एका खोट्या व्हिडीओमुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादकांना किलोमागे १० रुपयांचे नुकसान सहन करावे लागले. विशेष म्हणजे हा व्हिडीओ उत्तर भारतातील एका माथेफिरूने प्रसारित केला होता. जिल्ह्यातील राहाता, श्रीगोंदा तालुक्यातील पारगाव, घारगाव, बेलवंडी, लोणीव्यंकनाथ हा परिसर द्राक्ष उत्पादनासाठी ओळखला जातो.

### राजकारण समाजहिताचे असावे : थोरात

**संगमनेर :** लोकसभा निवडणुकीमध्ये राज्यात काँग्रेस पक्षाला आणि महाविकास आघाडीला मोठे यश मिळाले. मात्र त्यानंतर सत्ताधाऱ्यांनी धर्माचे अत्यंत टोकाचे राजकारण केले. लोकशाहीमध्ये हार-जित हा अविभाज्य भाग असून राजकारण हे सत्तेसाठी नव्हे तर समाजाच्या हितासाठी करायचे असते, असे प्रतिपादन काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले. येथील अमृतवाहिनी बँकेमध्ये जिल्हा काँग्रेस कमिटीची सहविचार बैठक नुकतीच पार पडली. यावेळी ते बोलत होते.

### किराणा दुकानाची भिंत फोडून चोरी

**नेवासा :** तालुक्यातील कोल्हार खुर्द येथे ग्रामपंचायत परिसरात असलेल्या मळगंगा किराणा स्टोअर्स या किराणा दुकानाची मागील बाजूची भिंत फोडून दुकानातील गोडतेलं पिशव्या, तांदूळ, अशा वस्तूंसह गल्लूयातील चिल्लरसह रोकड चोरी गेल्याची घटना रात्री साधारण तीन वाजेच्या दरम्यान घडली आहे. सकाळी नेहमीप्रमाणे दुकान उघडण्यासाठी दरवाजे उघडले असता अनिल शिरसाठ यांच्या हा प्रकार लक्षात आला. सीसीटीव्हीची करडी नजर असतानाही भिंत फोडून झालेली चोरी हा चर्चेचा विषय ठरला आहे.

### राहुरीत सहा महिलांना घेतले ताब्यात

**राहुरी :** पोलिस पथकाने राहुरी बसस्थानक परिसरात वेश्या व्यवसाय करणाऱ्या सहा महिलांना ताब्यात घेतले. या कारवाईचे अनेकांनी स्वागत केले. बसस्थानक परिसरात अनेक वर्षांपासून अवैध वेश्या व्यवसाय सुरू आहे. या महिला बसस्थानकाच्या प्रवेश द्वारा जवळच दिवसा अश्लील हावभाव करतात. जवळच्या लॉजवर हा व्यवसाय चालतो. कॉलेज तरुण तरुणी व प्रवाशी महिलांची यामुळे कुचंबणा होते. याबाबत कारवाईची मागणी होत होती.

# शिरुरचा 'पाटीवाला पुणेकर' पोहोचला दिल्लीच्या साहित्य संमेलनात !

**दिल्लीच्या तख्तावर पाट्यांमधून मराठीचा जागर | खा. सुप्रिया सुळे यांच्याकडून गौतम घावटे याचे कौतुक**




### खा. सुप्रिया सुळे यांनाही गौतमच्या पाटीची भुरळ !

दिल्लीच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात पुढच्या पिढ्यांसाठी पुणेरी संस्कृतीचा गजर केला त्याला रसिकांनी भरभरुन प्रतिसाद दिला. पुणेरी पाटीला संसद महारत्न खासदार सुप्रिया सुळे यांचा मोलाचा पाठींबा आणि शुभेच्छा मिळाल्या, त्यांच्या प्रेरणादायी शब्दांनी आम्हाला अधिक उर्जा आणि उत्साह मिळाला. इतकेच नव्हे तर त्यांनी पुणेरी पाट्यांसह आपल्या फेसबुक पेजवर पोस्ट केली हा सर्वात आनंददायी क्षण. यापुढे हीच पुणेरी संस्कृती जोपासत तिचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील राहू.

**गौतम कर्डीले**
पाटीवाला पुणेकर

**शिरुर : सतीश डोंगरे**

**उपरोधिक आणि उपहासात्मक विनोदी पाट्यांच्या माध्यमातून सामाजिक संदेश देत पुणेकरांच्या गळ्यातील ताईत बनलेला पाटीवाला पुणेकर अर्थात शिरुरचा गौतम कर्डीले याने दिल्लीच्या तख्तावर मराठी साहित्य संमेलनात हजेरी लावत पाट्यांच्या माध्यमातून माय मराठीचा जागर केला. साहित्य संमेलनात गाजलेल्या विविध कार्यक्रमांबरोबरच गौतमच्या मराठी पाट्या संमेलनात चर्चेचा विषय ठरल्या.**

दि.२१, २२ आणि २३ फेब्रुवारी २०२५ या तीन दिवसांत दिल्लीत ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पार पडले. दिल्लीचेही तख्त राखतो महाराष्ट्र माझा ही केवळ कविकल्पना नाही तर आपल्या अस्मितेचा आणि अभिमानाचा विषय याचा प्रत्यय सर्वांना या ऐतिहासिक संमेलनातून आला. भाषा, संस्कृती, राष्ट्रभावना, मानवता आणि एकात्मता यांचा आगळा मिलाफ साधत शिरुरच्या गौतम कर्डीले या युवकाने उपरोधिक आणि उपहासात्मक विनोदी पाट्यांच्या माध्यमातून माय मराठीचा केलेला जागर सर्वांनाच सुखावून गेला.

आपली मराठी भाषा तुमच्या मेहुणी पेक्षा गोड आणि बायकोपेक्षा तिखट नक्कीच आहे, त्यामुळे तिच्यावर प्रेम हक्काने करायलाच हवं ! तसेच इंग्रजीत कोणी शिव्या दिल्या तर मराठीत कानफाड फोडणारा खरा मराठी माणूस! यांसारख्या हलक्या फुलक्या हस्तलिखित मराठी पाट्यांनी साहित्य संमेलनात सर्वांचेच लक्ष वेधले. संमेलनात सहभागी झालेल्या अनेक मान्यवरांनी गौतमच्या या अनोख्या उपक्रमाचे स्वागत करीत त्याच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली.

गौतम गेली अनेक वर्षांपासून पुण्यात विविध सण, समारंभ, जयंत्या यांचे निमित्त साधत मराठी पाट्यांचे हात उंचावून प्रदर्शन करीत आहे, त्यातून त्याची पाटीवाला पुणेकर अशी वेगळी ओळख बनली आहे. आता मराठी साहित्य संमेलनाचे निमित्त साधत त्याने थेट दिल्लीच्या तख्तावर धडक मारल्याने शिरूरकरांचा ऊर ही अभिमानाने भरुन आला आहे.

# रांजणगांवला आता घोड धरणावरुन पाणीपुरवठा योजना !

**पाणीपुरवठा योजना तातडीने मार्गी लावा | उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संबंधित अधिकारी आणि यंत्रणांना सूचना**

**शिरुर : प्रतिनिधी**



**रांजणगाव गणपती ग्रामपंचायतीचे तीर्थपर्यटनाच्या दृष्टीने असलेले महत्व तसेच ग्रामपंचायत हद्दीत एमआयडीसी असल्यामुळे या क्षेत्रात स्थलांतरीत लोकसंख्येचे प्रमाण अधिक असून भविष्यातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करुन जलजीवन मिशनअंतर्गत घोड धरणावरून नवीन पाणीपुरवठा योजना तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज संबंधित अधिकारी आणि यंत्रणांना दिल्या.**

रांजणगाव गणपती आणि परीसरातील ग्रामपंचायतीच्या विविध प्रश्नांसंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील समिती कक्षात मंगळवारी (ता.२५) बैठक आयोजित करण्यात आली होती. रांजणगावची भविष्यातील गरज ओळखून ग्रामपंचायत परिसरात मोठ्या क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी जिल्हा नियोजन समिती, स्वच्छ भारत मिशनमधून निधी देण्यात येईल, त्यासोबत ग्रामपंचायतीच्या वाट्यासह सीएसआर निधी उभारण्याच्या सूचना श्री. पवार यांनी जिल्हाधिकारी यांना दिल्या.

बैठकीला उद्योगमंत्री उदय सामंत (दूरदृश्य प्रणालीद्वारे),पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील, माजी मंत्री आमदार दिलीपराव वळसे पाटील (दूरदृश्य प्रणालीद्वारे), वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, पुणे विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार (दूरदृश्य प्रणालीद्वारे), पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी (दूरदृश्य प्रणालीद्वारे), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक कुणाल खेमनार, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील (दूरदृश्य प्रणालीद्वारे), महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता वैशाली आवटे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे जनरल मॅनेजर (भूसंपादन) बप्पासाहेब थोरात, आंबेगाव-शिरुर विधानसभा मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मानसिंग पाचुंदकर पाटील, आंबेगाव- शिरुर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष अमोल जगताप, कामगार कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष तथा रांजणगाव गणपतीचे उपसरपंच श्रीकांत पाचुंदकर पाटील, प्रा.माणिक खेडकर, रांजणगाव गणपती विविध सोसायटीचे माजी चेअरमन महेश फंड, युवा उद्योजक राहुल शेळके, प्रतापराजे फंड, दिपक खैरे यांच्यासह संबंधित विभाग व यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. पवार बैठकीत मार्गदर्शन करताना म्हणाले की, अष्टविनायकांपैकी असलेले रांजणगाव गणपती हे ठिकाण राज्यातील एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र, पर्यटनस्थळ म्हणून नावारुपाला आले आहे. या परिसरात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून अनेक उद्योग-व्यवसाय उभे राहिले आहेत. त्यामुळे रांजणगाव गणपती ग्रामपंचायत हद्दीत स्थलांतरीत लोकसंख्येचे प्रमाण वाढत आहे. त्याचा ताण ग्रामपंचायतीच्या पायाभूत सुविधांवर पडत आहे. यासह भविष्यातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करुन जलजीवन मिशनअंतर्गत घोड धरणावरून नवीन पाणी पुरवठा योजना तातडीने मार्गी लावावी.

# बाळासाहेब थोरात यांना सहकारतीर्थ गुलाबराव पाटील पुरस्कार जाहीर

**सांगलीत रविवारी वितरण सोहळा**

**संगमनेर : प्रतिनिधी**

**माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांना महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, सहकार, शिक्षण व कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दलचा यावर्षीचा सहकारतीर्थ गुलाबराव पाटील पुरस्कार जाहीर झाला आहे.**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे माजी अध्यक्ष तथा माजी खासदार सहकार चळवळीतील अग्रणी नेते स्व. गुलाबराव पाटील यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दरवर्षी गुलाबराव पाटील मेमोरियल ट्रस्टच्या वतीने महाराष्ट्रातील सामाजिक, राजकीय ,सहकार ,कला, साहित्य या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना सहकारतीर्थ गुलाबराव पाटील पुरस्कार देण्यात येत असतो.



रविवारी (ता. २ मार्च) सकाळी ११ वाजता भावी नाट्यमंदिर सांगली येथे ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते हा मानाचा पुरस्कार माजी मंत्री थोरात यांना प्रदान केला जाणार असल्याचे संस्थापक चेअरमन पृथ्वीराज गुलाबराव पाटील यांनी सांगितले.

## वाचकांच्या लेखणीतून

# बोबडे लोक!




ख़ुशगुफ़्तारी ज़बान का सदका है. असा उर्दू सुविचार वाचला होता. चांगले बोलणे ही वाणीची खैरात आहे. असा त्याचा अर्थ आहे. शब्दांचे स्पष्ट उच्चारण हाही त्यातलाच एक भाग आहे.

जगातल्या कुठल्याही भाषेची लिपी परिपूर्ण नाही. परिपूर्णतेच्या जवळ जाणारी एकच भाषा जगात आहे. संस्कृत! तिच्या लिपीला देवनागरी लिपी म्हणतात. गृह या शब्दाचे उच्चारण काही जण ग्रिह, काही जण ग्रह तर काही जण ग्रुह असा करतात. स्पृश्य या शब्दाचा उच्चार स्प्रिश्य, स्प्रश्य किंवा स्प्रुश्य असा केला जातो. गृह आणि स्पृश्य या दोन्हीही शब्दांचे उच्चार मला चुकीचे वाटतात. हे दोन्ही शब्द संस्कृत, हिंदी आणि मराठी या तिन्ही भाषांत आहेत. या तिन्ही भाषांची लिपी एकच म्हणजे देवनागरीच आहे.

माझ्या मतानुसार खरा प्रकार वेगळाच असावा. उर्दू भाषेत ग़म, काफ़ी या शब्दांचे उच्चारण उर्दू शिकलेले वा उर्दू मातृभाषी लोक बरोबर करतात. आपल्याला ते बरोबर उच्चारता येत नाही. त्याप्रमाणेच पूर्वी कधी काळी गृह शब्दातले गृ या अक्षराचे किंवा स्पृश्य शब्दातील स्पृ या जोडाक्षराचे बरोबर उच्चारण होत असावे. पण कालप्रवाहात या अक्षरांचे अथवा शब्दांचे वास्तविक उच्चारण मागे पडत गेले असावे. आज ते कोणालाही ठाऊक नाही!

आपल्या हिंदुस्थानी लोकांचा, विशेषत: संस्कृत जाणणाऱ्या (ब्राह्मण) लोकांचा पाश्चात्य लोकांशी संबंध आला. त्यातही इंग्रज लोकांशी अधिक आला. संस्कृत जाणणारे हिंदुस्थानीही इंग्रजी शिकले. आपली संस्कृत भाषा उच्चारणाशी जास्तीत जास्त प्रामाणिक आहे.

इंग्रजी (आणि फ्रेंच, जर्मन या युरोपीय भाषाही) त्यांच्या भाषेच्या उच्चारणाशी प्रामाणिक नाहीत. (हेतू) या शब्दाचे पर्पज असे न करता इंग्रजीत पपज असे उच्चारण केले जाते. (कोर्स) चे उच्चारण इंग्रजी भाषेत कोस असे होते. म्हणूनच आपले तत्कालीन सुशिक्षित लोक इंग्रजांना बोबडे लोक म्हणत! ते काही चुकीचे नव्हते. अगदी अन्वर्थकच होते ते.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

# १ लाख भाविकांनी घेतले साईदर्शन!

**४० हजार भाविकांना खिचडीचा लाभ | साई मंदिरात दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन**



**शिर्डी : प्रतिनिधी**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांच्या वतीने महाशिवरात्रीचा उत्सव मोठ्या भक्तिभावाने अन् धार्मिक विधींनी संपन्न झाला. बुधवारी (२६ फेब्रुवारी) दिवसभरात एक लाखांहून अधिक भाविकांनी श्री साईचरणी नतमस्तक होत साईबाबांच्या समाधी दर्शनाचा लाभ घेतला. साई मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, तर साईबाबा संस्थानच्या वतीने भाविकांसाठी साबुदाणा खिचडी प्रसादाची मोफत व्यवस्था करण्यात आली होती.**

दिवसभरात श्री साईप्रसादालयात सुमारे ४० हजार साईभक्तांनी खिचडीचा लाभ घेतला. यंदा भाविकांशिवाय अन्य लोकांना मोफत भोजन बंद करण्यात आल्याने मागील वर्षीच्या तुलनेत खिचडी प्रसादाचा लाभ घेणाऱ्या भाविकांची संख्या २८ हजारांनी कमी झाल्याचे दिसून आले. महाशिवरात्रीनिमित्ता ने हजारो भक्त शिर्डीत दाखल झाले होते. पहाटे ५.१५ वाजता काकड आरतीने उत्सवाला सुरुवात झाली. त्यानंतर श्रींचे मंगलस्नान व ''शिर्डी माझे पंढरपूर' ही आरती पार पडली. दिवसभर दर्शनासाठी मंदिरात भाविकांची मोठी रांग होती. दुपारी १२ वाजता माध्यान्ह आरती, संध्याकाळी ६.१५ वाजता धुपारती, रात्री ७.३० वाजता समाधी मंदिराच्या स्टेजवर मंदिर कर्मचारी किशोर सासवडे यांचे कीर्तन झाले.

**समाधीवर दिवसभर शंकराची प्रतिमा**

महाशिवरात्रीनिमित्त समाधीवर दिवसभर भगवान शंकराची प्रतिमा ठेवण्यात आली, तसेच सायंकाळी साईच्या अन्य आरत्यांबरोबरच भगवान शंकराचीही आरती झाली. साईमूर्तीला सुवर्ण मुकुटासह करोडो रुपयांचे सोन्याचे अलंकार आणि बेलांच्या पानांचा हार घालण्यात आला होता.

**खिचडीसाठी ४५ पोते साबुदाणा**

साबुदाणा खिचडी तयार करण्यासाठी ४५ पोते साबुदाणा, ३७०० किलो शेंगदाणे, ६६१ किलो तूप आणि २२५४ किलो बटाटे आदींचा वापर करण्यात आला. श्री साईबाबा संस्थानच्या वतीने महाशिवरात्रीनिमित्त भाविकांसाठी १४,५५७ नाष्टा पाकिटांचे वितरण केले.

(पान १ वरून)

## स्वारगेट प्रकरणातील आरोपीची खैर नाही

सर्व लागेबांधे पोलिसांच्या हाती आलेले आहेत. त्याला कुठल्याही परिस्थिती तत्काळ अटक केली होईल.

अशाप्रकारचे नराधम आमच्या लाडक्या बहिणींवर अत्याचार करत असतील, तर त्यांची गय केली जाणार नाही, सोडले जाणार नाही. अशा नराधमांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे, यासाठी पूर्णपणे प्रयत्न करण्याचे सरकारचे धोरण आणि भूमिका असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. आरोपी हा कुठल्याही पक्षाचा असू द्या, त्याचा कोणाशीही संबंध असला, तरी त्याची गय केली जाणार नाही. हा गुन्हेगार आहे. लाडक्या बहिणीवर अत्याचार करणाऱ्या गुन्हेगाराला सोडले जाणार नाही, असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

**बंद पडलेल्या बस निकाली काढण्याच्या सूचना**

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याशी माझी चर्चा झाली आहे. ज्या बस आगारात बंद पडलेल्या बसमध्ये होणारे गैरप्रकार पूर्णपणे बंद झाले पाहिजेत. अशा प्रकारच्या बंद पडलेल्या गाड्या तत्काळ निकाली काढाव्यात. कुठल्याही परिस्थितीत गुन्हेगारीला वाव मिळता कामा नये, अशा सूचना सर्व आगार प्रमुखांना दिल्या आहेत. परिवहन मंत्र्यांनी काल सुरक्षा रक्षकांवर निलंबनाची कारवाई केलेली आहे. या प्रकरणात कुणालाही पाठिशी घातले जाणार नाही. एसटी महामंडळ प्रशासन आणि सरकारच्या वतीने कठोर कारवाई केली जाईल. लाडक्या बहिणी सुरक्षित राहिल्या पाहिजे, अशी सरकारची भूमिका आहे.

# लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी!

## अळकुटी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन



■ अळकुटी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला.

**जागतिक स्तरावर ओळख**

**मराठी भाषेला समृध्द वारसा लाभलेला आहे. म्हणूनच मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. मराठी भाषेस संत परंपरेने अधिकच समृध्द बनविले आहे. मराठी भाषा साहित्यिकांना तसेच समीक्षकांना मराठी भाषेला जागतिक स्तरावर एक वेगळी ओळख निर्माण करून देण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे. अभिजात मराठी भाषा गौरव दिन हा महाराष्ट्राचा एक उत्सवच आहे.**

**डॉ. कुंदा कवडे,** प्राचार्य

**अळकुटी : प्रतिनिधी**

**मराठी भाषा ही प्रदेशानुरूप बदलत असली तरी महाराष्ट्र म्हणून ती एकरूप आहे. मराठी भाषेमुळे उर्जा मिळते. म्हणूनच लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी असे अभिमानाने बोलले जात असल्याचे प्रतिपादन प्रा. शिवाजी शेळके यांनी केले.**

अळकुटी येथील प्रवरा शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने कवी कुसूमाग्रजांच्या जयंतीनिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी प्रा. शेळके हे बोलत होते. प्राचार्या डॉ. कुंदा कवडे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या.

यावेळी बोलताना प्रा. शेळके म्हणाले, कवी कुसुमाग्रज यांचा जयंतीदिन हा मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. कारण मराठी भाषेला शास्त्रीय स्वरूप प्राप्त करून देण्यात कुसुमाग्रजांचे योगदान मोठे आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत जनाबाई, संत सावतामाळी आदी सर्वच मराठी संतांनी मराठी भाषेला अध्यात्मादवारे चैतन्य प्रदान केले. बोली भाषा व प्रमाण भाषा या भाषा विषयाच्या दोन शाखा असल्याचे प्रा. शेळके यांनी नमुद केले.

यावेळी प्रा. प्रशांत लोखंडे, प्रा. विशाल रोकडे, गोरख घोलप, प्रा. संजय जाधव, प्रा. स्वाती फापाळे, प्रा. दशरथ पानमंद, प्रा. पांडूरंग उघडे, प्रा. सचिन बलसाने, प्रा. सुनिता जाधव, प्रा. विनायक सोनवणे, प्रा. पोपट सुंबरे, प्रा. दत्तात्रय शेळके, प्रा. रावसाहेब झावरे, प्रा. ऋषीकेश गिते, प्रा. शर्मिष्ठा बोरूडे, प्रा. शांता थोरात, प्रा. प्रियंका दिवटे, प्रा. सुषमा करकंडे, प्रा. अनुराधा गाढवे, प्रा. मोहन माने, प्रा. राजाराज गोरडे, प्रा. पुजा वैरागर, प्रा सुप्रिया पारखे, सुर्यमाला भोर, सुनिता भालेराव, नितन घोलप, छाया म्हस्के, विकास सोनवणे आदी उपस्थित होते.

# रविंद्र राजदेव यांचे शुक्रवारी अभिष्टचिंतन

■ खा. नीलेश लंके, आ. शरद सोनवणे यांची उपस्थिती
■ होम मिनिस्टर खेळ पैठणीचा कार्यक्रमाचेही आयोजन



**नांदूरपठार : प्रतिनिधी**

**नांदूरपठारचे मा. उपसरपंच तथा नीलेश लंके प्रतिष्ठानचे सक्रीय सदस्य रविंद्रशेठ राजदेव तथा आर.आर. यांच्या ४० व्या वाढदिवसानिमित्त शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी रोजी अभिष्टचिंतन सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे.**

या सोहळयासाठी खासदार नीलेश लंके तसेच जुन्नरचे आमदार शरद सोनवणे हे उपस्थित राहणार आहे. दरम्यान, महिलांसाठी उध्दव काळापहाड प्रस्तुत होम मिनिस्टर, खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हा परिषदेच्या मा. सदस्या राणीताई लंके यांच्या हस्ते खेळ पैठणीच्या या कार्यक्रमाचा शुभारंभ होणार असून या खेळामध्ये विजेतेपद पटकविणाऱ्या सखीसाठी नीलेश देवराम चिकणे यांच्या वतीने फ्रीज भेट देण्यात येणार आहे. उपविजेत्या सखीसाठी संदीप देवराम राजदेव यांच्या वतीने एलईडी टि.व्ही, तिसऱ्या क्रमांसाठी अशोक आहेर यांच्या वतीने वॉटर फिल्टर, चौथ्या क्रमांकासाठी विलास घोलप यांच्या वतीने मिक्सर, पाचव्या क्रमांकासाठी मा. सरपंच भानुदास आग्रे यांच्या वतीने इस्त्री देण्यात येणार आहे तर मानाच्या पैठणीसाठी माधवशेठ आग्रे यांचे सौजन्य लाभले आहे.

कादंबरी पतसंस्थेच्या संचालिका सोनिया रविंद्र राजदेव यांच्यासह सरपंच श्रामिणी चौधरी, चित्रा घोलप, कोलम आग्रे, प्रमिला दिवेकर, सारिका आग्रे, सोनाली आग्रे आदींनी होम मिनिस्टर या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

**कार्यक्रमाची रूपरेषा**

**सायंकाळी ६ वाजता उध्दव काळापहाड प्रस्तुत होम मिनिस्टर या कार्यक्रमाचा शुभारंभ राणीताई लंके यांच्या हस्ते करण्यात येईल. यावेळी हळदी कुंकू तसेच वाण वितरण करण्यात येईल. सायंकाळी ८ वाजता अभिष्टचिंतन सोहळयास खा. नीलेश लंके व आ. शरद सोनवणे यांच्या उपस्थितीत प्रारंभ होईल. तर रात्री ९ वाजता स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे.**

# विधायक राजकारणासाठी देवीभोयरेकर एकत्र!

## शिवाजी जाधव, संपत वाळुंज, अशोक मुळे यांचा आदर्श



■ शिवाजी जाधव, संपत वाळुंज व अशोक मुळे यांनी मतभेद दुर सारून गावाच्या विकासासाठी एकत्र येण्याचा निर्णय घेतला.

**इतरांनीही आदर्श घ्यावा**

**सकारात्मक राजकारण करण्यासाठी या त्रिमुर्तीने घेतलेल्या निर्णयाचे देवीभोयरे परिसरासह तालुक्यात कौतुक होत असून इतर गावांमधील मदभेदही असेच दूर झाल्यास तालुक्याचा विकास अधिक गतीमान होईल अशा भावना व्यक्त करण्यात येत आहेत.**

**देवीभोयरे : प्रतिनिधी**

**देवीभोयरे ग्रामपंचायतीच्या सार्वत्रीक निवडणूकीत एकमेकांविरोधात लढलेले अंबिका देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष शिवाजीराव जाधव, उपाध्यक्ष संपतराव वाळुंज व सरपंच अशोकराव मुळे यांनी गावाच्या विकासासाठी विधायक राजकारणासाठी एकत्र येत आदर्श निर्माण केला.**

लोकशाही प्रक्रियेत कोणत्याही निवडणूका या स्पर्धात्मक असतात. मात्र निवडणूका संपल्यानंतर सर्व कटूता दूर सारून सर्वांनी गावाच्या विकासासाठी एकत्र येणे हे खऱ्या नेतृत्वाचे लक्षण आहे. जाधव, वाळुंज व मुळे यांनी कृतीतून हे सिध्द करून दाखविले आहे.

देवीभोयरे ग्रामपंचायतीच्या सार्वत्रीक निवडणूकीमध्ये तिघेही एकमेकांच्या विरोधात होते. निवडणूकीचा निकाल लागल्यानंतर तिघांनीही आपसातील मदभेद दूर सारून, निवडणूकीतील कटूता विसरून गावाच्या प्रगतीसाठी एकमेकांना सहकार्य करण्याचा निर्णय घेतला. विकासासाठी संवाद, सहकार्य आणि सकारात्मक दृष्टीकोन या मुल्यांना त्यांनी प्राधान्य दिले.

ग्रामपंचायत निवडणूकीत एकमेकांविरोधात लढले तरी तिघेही खासदार नीलेश लंके यांचे ते समर्थक आहेत. विकास कामांमध्ये राजकारण आडवे येऊ न देता सकारात्मक विचार करण्याचे त्यांनी ठरविले. गावाच्या प्रवेशद्वाराच्या नामकरणासाठीही त्यांनी सकारात्मक विचार करून सर्वोत्तम पर्याय निवडला. असाच दृष्टीकोन सर्वांनी मनामध्ये रूजविला तर गावाचा विकास राजकीय मतभेदांच्या पलीकडे जाऊन अधिक गतीमान होण्यास मदत होईल. हीच खरी लोकशाही आणि हाच विकासाचा आदर्श मार्ग असल्याची प्रतिक्रीया शिवाजीराव जाधव, संपतराव वाळुंज व सरपंच अशोकराव मुळे यांनी दिली.

# घरकुलांचा पहिला हप्ता खात्यावर वर्ग

## ३ हजार २३ कुटूंबांना लाभ



**पारनेर : प्रतिनिधी**

**राज्य शासनाच्या वतीने गृहनिर्माण योजनांसाठी महाअवास अभियानांतर्गत एकूण ४ हजार २३ लाभार्थ्यांपैकी ३ हजार ६२३ लाभार्थ्यांना घरकुलाचा पहिला हप्ता त्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आला. घरकुल मंजुरीचे पत्र आ. काशिनाथ दाते यांच्या हस्ते लाभार्थ्यांना देण्यात आले.**

राज्य शासनाने शंभर दिवस कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी व लोकसहभागासाठी अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला होते. त्या अनुषंगाने मुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री यांच्या उपस्थितीत व्हिडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून राज्यभरातील प्रधानमंत्री आवास योजनेचे लाभार्थी तसेच तालुक्यातील पदाधिकाऱ्यांशी संवाद साधण्यात आला.

यावेळी बोलताना आ. काशिनाथ दाते म्हणाले, महायुती सरकार सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या अनेक योजना राबवित आहे. घरकुल योजनाही त्याचाच एक भाग आहे. राज्यातील एकही व्यक्ती घराविना राहू नये हे धोरण केंद्र व राज्य सरकारने घेतलेले आहे. पारनेर तालुक्यातील जे कुटूंब घरकुल योजनेपासून वंचित आहेत त्या कुटूंबाच्या प्रमुखांनी पंचायत समिती मध्ये आपले प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन आ. दाते यांनी केले. यावेळी प्रभारी गटविकास अधिकारी दयानंद पवार, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष दुधाडे यांच्यासह पंचायत समितीचे विस्तार अधिकारी उपस्थित होते.

# डॉ.अद्वैत यांचा एम.एस. अभ्यासक्रमासाठी प्रवेश

## सर्जरीच्या उच्च शिक्षणासाठीच्या परीक्षेत यश



**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज येथील वैद्यकीय क्षेत्रातील उदयोन्मुख डॉक्टर अद्वैत काळे यांना एमबीबीएस पदवीनंतर सर्जरीच्या उच्च शिक्षणासाठी पुण्यातील श्रीमती काशीबाई नवले मेडिकल कॉलेज अॅण्ड हॉस्पिटल मास्टर ऑफ सर्जरी या अभ्याक्रमासाठी प्रवेश मिळाला आहे. राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या स्पर्धात्मक नीट पी जी परीक्षेत यश संपादन करून डॉ. अद्वैत यांनी हा प्रवेश मिळविला आहे.**

डॉ. काळे यांनी त्यांच्या एबीबीएसच्या अभ्यासक्रमात मुंबईच्या लोकमान्य टिळक मेडिकल म्युन्सिपल कॉलेज येथे यश मिळविले होते. हा अभ्यासक्रम पुर्ण करताना त्यांनी रूग्णसेवा आणि संशोधनात विशेष रस दाखविला.

एम.एस.अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी नीट-पीजी या स्पर्धा परीक्षेमध्ये हजारो विद्यार्थी स्पर्धेत असतात. या स्पर्धात्मक परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात यशस्वी होते हे डॉ. काळे यांच्या क्षमतेचे प्रतीक आहे. त्यांच्या भविष्यातील योजनांमध्ये हृदयशल्य चिकित्सा यात संशोधन करणे याचा समावेश आहे. डॉ. अद्वैत यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल त्यांच्या कुटूंबियांनी तसेच सहकाऱ्यांनी आनंद व्यक्त केला. डॉ. अद्वैत यांच्या या यशाने इतर युवकांनाही प्रेरणा मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

**अत्याधुनिक सेवा पुरविण्याची संधी मिळेल**

**एम.एस.या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश म्हणजे माझया वैद्यकीय करिअरमधील एक महत्वाचा टप्पा आहे. मला रूग्णांना अत्याधुनिक सर्जिकल सेवा पुरविण्याची संधी मिळेल.**

**डॉ. अद्वैत काळे**

# शंकरराव पठारे पठारवाडीचे उपसरपंच; बिनविरोध निवड



**निघोज : प्रतिनिधी**

**पठारवाडी ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी अभ्यासू सदस्य शंकरराव पठारे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांच्या या निवडीबद्दल मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.**

मावळते उपसरपंच भिकाजी पठारे यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या पदावर निवड करण्यासाठी ग्रामपंचायत सदस्यांची विशेष सभा बोलविण्यात आली होती. शंकरराव पठारे यांची ग्रामपंचायतीचे उपसरपंच म्हणून सदस्य मारूती पठारे यांनी सुचना मांडली. त्यास मा. उपसरपंच दौलत सुपेकर यांनी अनुमोदन दिले. निवडणूक निर्णय अधिकारी देंडगे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. यावेळी सरपंच उर्मिला सुपेकर, ग्रामपंचायत सदस्य भिका पठारे, नंदाबाई पवार, शारदाबाई बोदगे हे सदस्य उपस्थित होते.

पठारे यांच्या निवडीचे खासदार नीलेश लंके, शिवसेनेचे तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे, भाजपाच्या राज्य कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे, पंचायत समितीचे मा. सभापती सुदाम पवार, मा. सदस्य डॉ. भास्कर शिरोळे, बाजार समितीचे संचालक किसन सुपेकर, संदीप पाटील वराळ फाउंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन वराळ, निघोजचे उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे, मा. सरपंच ठकाराम लंके यांनी अभिनंदन केले.

**संधीचे सोने करणार !**

**ज्येष्ठ मंडळींनी माझ्यावर विश्वास ठेऊन मला उपसरपंचपदावर काम करण्याची जी संधी उपलब्ध करून दिली, त्या संधीचे सोने करण्यासाठी मी प्रयत्नांची पराकाष्ठा करणार आहे. ज्येष्ठांच्या आशिर्वादाने सर्वांना बरोबर घेऊन पठारवाडीच्या विकासात योगदान असणार आहे. तालुका पातळीवर असलेल्या राजकीय संबंधाचा मी गावाच्या विकासासाठी फायदा करून घेणार आहे.**

# कुंड रस्त्याची दैना!

## रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे | कॉंक्रिटीकरण करण्याची मागणी



**निघोज : प्रतिनिधी**

**कुंड पर्यटनस्थळ तसेच जागतिक रांजणखळगे असलेल्या कुंडाकडे जाणाऱ्या रस्त्याची दैना झाली असून पर्यटक तसेच भाविकांची रस्त्यावरील खड्ड्यांमुळे कुचंबना होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करण्याची मागणी करण्यात येत आहे.**

निघोज बस स्थानक ते कुंड पर्यटनस्थळ हे साडेतीन किलोमीटरचे अंतर आहे. काही वर्षांपूर्वी या रस्त्याचे डांबरीकरण झाले होते. आज मात्र या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असून त्यामुळे वाहन चालकांना रस्ते चुकविताना कसरत करावी लागत आहे. त्यातून आपघातालाही आमंत्रण मिळते आहे.

निघोजमध्ये मळगंगा देवीचे जागृत देवस्थान असून कुंड परिसरात मळगंगा देवीच्या मंदिरासह जगप्रसिध्द रांजणखळगे, लोखंडी झुलता पुल हे पाण्यासाठी, देवीच्या दर्शनासाठी पुणे तसेच नगर जिल्ह्यातील शेकडो भाविक, पर्यटक दररोज भेट देतात. त्यांची गैरसोय दूर करण्यासाठी या रस्त्याचे काम तात्काळ सुरू होणे गरजेचे आहे.

**यात्रोत्सवापूर्वी काम व्हावे**

**मळगंगा देवीची यात्रा दि.२१ एप्रिल ते २४ एप्रिल दरम्यान पार पडणार आहे. एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवडयात देवीला हळद लावली जाईल. या यात्रोत्सवासाठी राज्यभरातील लाखो भाविक हजेरी लावतात. दोन दिवस निघोज गावात तर दोन दिवस कुंडावर यात्रा भरते. त्यामुळे यात्रोत्सवापूर्वी या रस्त्याचे काम मार्गी लागावे अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात येत आहे.**

**नगर-पुणे जिल्ह्याला जोडणारा रस्ता**

**टाकळी हाजी मार्गे नगर व पुणे जिल्हयाला जोडणारा रस्ता असल्याने या मार्गावर वाहनांची मोठी वर्दळ असते. कुकडी कालव्यामुळे समृध्द झालेल्या या भागात मोठया प्रमाणावर शेती उत्पादने घेण्यात येतात. या शेतमालाची वाहतूकही याच रस्त्याचे केली जाते. कुंड पर्यटन स्थळ, जगप्रसिध्द रांजणखळगे तसेच मळगंगा देवस्थान या बाबींचा विचार करून सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्याचे काम तात्काळ हाती घेणे गरजेचे आहे.**

# संगमेश्वराच्या मिरवणूकीत महिलांचा उत्साह!

## शिवरात्री निमित्त विविध कार्यक्रम




**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर शहरातील बारा ज्योर्तिलिंगांपैकी एक असलेल्या पुरातन संगमेश्वर मंदिरात शिवरात्रीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शिवरात्रीच्या दिवशी काढण्यात आलेल्या संगमेश्वरांच्या मिरवणूकीमध्ये महिलांचा उत्साह पहावयास मिळाला.**

बुधवारी सायंकाळी मंदीरापासून निघालेली मिरवणूक मुख्य बाजारपेठेतून पुन्हा मंदीरात पोहचली. वाजत गाजत निघालेल्या मिरवणूकीदरम्यान विविध ठिकाणी भाविकांनी संगमेश्वरांचे मनोभावे दर्शन घेतले.

दरवर्षीप्रमाणे शनिवार दि. २२ फेब्रुवारी ते गुरूवार दि.२७ फेब्रुवारी दरम्यान आळंदी येथील ह.भ.प.भागवताचार्य सोनाली दिदी महाराज यांच्या संगीतमय श्रीमद् भागवत कथा सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. गुरूवार दि.२७ रोजी सकाळी १० ते १२ दरम्यान सोनाली दिदींच्या काल्याच्या किर्तनाने या सोहळयाची सांगता झाली. या कथा सोहळयासाठी सिंथ वादक म्हणून ह.भ.प कृष्णा महाराज कळंबे जालना, तबला वादक ह.भ.प.गणेश महाराज घोडके आळंदी, पॅड वादक ह.भ.प. अतुल महाराज महाजन मध्य प्रदेश तर सह गायक म्हणून ह.भ.प.माऊली महाराज कपाटे आळंदी यांची साथ संगत लाभली. कथा सोहळयानिमित्त दररोज विविध अन्नदात्यांच्या माध्यमातून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. संगमेश्वर सेवा मंडळाच्या वतीने या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

**महिलांचा उत्साह**

**डोक्यावर कलश घेऊन मिरवणूकीत सहभागी झालेल्या महिलांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. भगवान शंकराची भजने गात, फुगडया खेळत महिलांनी या मिरवणूकीची रंगत वाढविली. पुरूष भाविक भगव्या टोप्या परिधान करून या मिरवणूकीमध्ये सहभागी झाले होते.**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com